जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

: **(ख)** "ग्रामपंचायत भोयर पंचायत समिती यवतमाळ येथे पाण्याची टाकी आणि विहीर मंजूर करुन मिळणेबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**(२) श्री.संजय दत्त, वि.प.स.** "कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद होण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(१) (गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**

**सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी १० महानगरपालिका, ११ जिल्हा परिषद आणि ११८ पंचायत समित्यांच्या झालेल्या निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मशीन (EVM मशीन) मध्ये झालेला घोळ, मतदार यादीतून नावे गायब झाल्याचे प्रकार उजेडात येणे, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) निर्माण झालेल्या गोंधळामुळे अनेकांना मतदानापासून वंचित रहावे लागल्याची बाब उजेडात येणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) मोठया प्रमाणात घोळ झाल्याचे सर्व राजकिय पक्षाने आक्षेप घेऊन सोलापूर, कोल्हापूर मध्ये नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन शासनाच्या विरोधात घोषणा देण्यात येणे, मुंबईच्या विविध भागातून मतदार यादीतून ११ लाख मतदारांची नावे गायब झाल्याने सुमारे ११ टक्के मतदारांना आपल्या मतदानाच्या हक्कापासून वंचित रहावे लागणे, यादयांमध्ये नाव न सापडणे, नाव शोधण्यातील अडचणी आणि नाव गायब असणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांत (EVM मशीन) मोठया प्रमाणात घोळ झाल्याने शासनाबाबत सर्वसामान्य जनमानसांत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व

उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**तेरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र शासनाने कोकण विभाग हा केमिकल झोन होणार असल्याचे जाहीर केले असणे, उक्त विभागात रासायनिक उद्योग नवीन नसून या आधीही खोपोली, रोहा, महाड, लोटे-परशुराम यासारख्या ठिकाणी रासायनिक उद्योगामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, तसेच कारखान्यांतुन सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे पाताळगंगा, कुंडलिका, सावित्री, जगबुडी, दाभोळ खाडी यासारख्या नद्या दुषित होणे, दुषित पाण्यामुळे मासे मृत्यू पावणे, शेती नापिक तसेच नागरिकांचे आरोग्यासह पर्यावरणावरही याचा परिणाम होत असणे, अशी परिस्थिती असताना शासन रासायनिक कारखाने लादत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून कोकणात या केमिकल झोनला सर्वच स्थरातून विरोध होत असणे, यासाठी लागणारी जमीन राज्य शासनाने संपादित करणे, मात्र या विभागात येणारी जमीन संपादित करण्याचे बंधन शासनावर नसून फक्त संबंधित कायद्याचे नोटिफिकेशन प्रसिध्द करुन ठेवणे, म्हणजे सातबाऱ्यावर शिक्के मारुन संपादनाची हमी शेतकऱ्यांच्या डोक्यावर कायम राहणे, कोकणातील सह्याद्रीचा पट्टा जागतिक स्तरावर सर्वाधिक जैव विविधतेचे क्षेत्र असल्याचे जाहीर झालेले असणे, देवगड हापूस हा भौगोलिक वेगळेपणा असलेला आंबा सर्व जगात प्रसिध्द असणे, कोकण किनारा म्हणजे सागरी संपत्तीची खाण समजली जाणे, आंबा, फणस, नारळ, सुपारी, काजू, कोकम यासारख्या विविध फळांनी नटलेले कोकण उत्पादनाबरोबरच एक मोठे पर्यटन केंद्रही असणे, किनारपट्टी रासायनिक उद्योगाने व्यापल्यावर त्यातून बाहेर पडणाऱ्या आणि समुद्रात सोडलेल्या प्रदुषित सांडपाण्याने सागरी संपत्तीचे, जैव विविधतेचे नुकसान झालेले असणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

**(२) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मौ.वालशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) या गावासाठी सन २०११ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने एमआरटीपी अधिनियम कलम २६ अन्वये विकास योजना प्रसिध्द केली व या योजनेंतर्गत वालशिंद या गावठाणालगत GWR Zone चे आरक्षण दाखविण्यात आले असणे, त्यास मौ.वालशिंद ग्रामस्थांनी विरोध करुन सदरचे आरक्षण रद्द करण्याबाबत शासनाकडे केलेली मागणी, सन २०१२ मध्ये

अधिनियमाचे कलम ३० अन्वये योजनेत सुधारणा करुन सदर गावचा GWR Zone रद्द करुन त्याऐवजी रहिवास मंडळ (R Zone) म्हणून अंतिम करणे, तथापि, त्यानंतर दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी सदर गावाच्या विकास योजनेस मंजुरी प्रदान करताना मात्र यापुर्वीचा रहिवास झोन काढून त्याऐवजी पुन्हा GWR (Ground Water Resource Zone) दर्शविण्यात येणे, तथापि, त्यास वालशिंद ग्रामस्थांचा विरोध असणे, त्याबाबत वालशिंद ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, आयुक्त, मुंबई महानगरपालिका, महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, ठाणे व मुंबई यांचेकडे दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी व त्यानंतरही तक्रार निवेदने सादर केली असणे, परंतु, अद्याप GWR Zone रद्द करण्याची कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे मौजे वालशिंद येथील गावठाणलगत GWR असलेला झोन वगळून U2 किंवा I Zone असा बदल करुन वालशिंद ग्रामस्थांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २१ मार्च, २०१७.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**